# औरंगाबादेत आता एटीएमकरीता ई-सुरक्षा

औरंगाबाद – सध्या किमान सुरक्षा नसल्याने एटीएम चोरांचे लक्ष्य बनले आहेत. त्याकरीता एटीएमवर गुन्हा होण्यापूर्वीच सक्रिय प्रतिबंधासह सेक्युरन्स सिस्टम प्रा. लि. ने तयार केले तंत्रज्ञान फायद्याचे आहे, अशी माहिती व्यवस्थापकीय संचालक सुनील उडुपा यांनी दिली. ते म्हणाले एटीएम चोरी अथवा फोडण्याचा गुन्हा घडतना अगदी काही सेकंदात कंपनीच्या सर्व्हरवर त्याची माहिति मिळेल. त्यावर कंपनी रीतसर कारवाई करुन वेळीच हा गुन्हा रोखण्यास मदत करणार आहे. सध्या भारतातील पाच हजारांहून अधिक बॅंकानी हे तंत्रज्ञान आत्मसात केले आहे. उर्वरित बॅंकानीही याची मदत घेण्याची गरज आहे. त्यामुळे कमी पैशांमध्ये बॅंकाच्या एटीएमची सुरक्षितता वाढेल.